**फौजदारी किरकोळ अर्ज क. ४१२/२०१७ मधील नि. ४ वरील आदेश**

अर्जदाराने सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ नुसार अर्जदारास दरमहा रू. ५०,०००/- व मुलीसाठी दरमहा रू. १०,०००/- अंतरिम पोटगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**थोडक्यात वस्तुस्थिती अशी आहे की,**

**२.** अर्जदार ही जाबदेणार क्र.१ ची कायदेशीर पत्नी असुन उभयतांचा विवाह दि. २६/०६/२०१२ रोजी कामठी येथे हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे झालेला आहे. लग्नाचे वेळी अर्जदाराच्या वडीलांनी जाबदेणार याला २ लाख रोख रक्कम दिली होती. लग्नानंतर अर्जदार ही जाबदेणार यांच्या घरी नांदावयास गेली. तेथे जाबदेणार यांनी थोडे दिवस व्यवस्थित नांदविले. अर्जदार ही माहेरी जावुन आल्यानंतर जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराला तिच्या वडीलांनी लग्नात पैसे दिले नाही म्हणुन शिवीगाळ केली. जाबदेणार क्र.२ ही अर्जदाराशी निट वागत नसे व तिला शिवीगाळ करीत असे. जाबदेणार क्र.५ सुध्दा अर्जदाराला शिवीगाळ करत असे. जाबदेणार क्र.३ हे अर्जदाराला तुम्ही लग्नात अपेक्षेप्रमाणे हुंडा दिला नाही म्हणुन त्रास देत असे. जाबदेणार क्र.३ हिने अर्जदाराच्या अंगावरील सोन्याचे तसेच चांदीचे दागिने काढुन घेतले. जाबदेणार क्र. १ ते ३ हे अर्जदाराला तु दिसायला सुंदर नाही तसेच जास्त शिकलेली नाही म्हणुन टोमणे मारत असत. तसेच जाबदेणार क्र.१ हा दुसरे लग्न करेल असे जाबदेणार क्र.३ अर्जदाराला धमकी देत असे. जाबदेणार क्र.५ हिने अर्जदाराला काही कारण नसतांना मारहाण केली.

**३.** अर्जदाराचे आई-वडील जाबदेणार यांना वेळोवेळी पैसे देत असत. जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराला तिच्या माहेरी सोडले व ५० हजार रोख रक्कम आणल्याशिवाय येवु नको असे सांगितले. अर्जदार ही दोन ते तीन दिवस माहेरी राहीली. अर्जदाराच्या आई-वडीलांनी जाबदेणा-यांना ब-याच वेळा फोन करुन अर्जदारास नेण्यास सांगीतले परंतु जाबदेणार यांनी त्यांची मागणी पुर्ण होईपर्यंत नेणार नाही असे सांगीतले. अर्जदाराच्या वडीलांनी कन्हान पोलीस ठाणे येथे तोंडी तक्रार दिली. तेव्हा जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराला व्यवस्थित नांदवितो अशी हमी

दिली. तसेच मौदा येथे त्याला काम मिळाले आहे व त्याप्रमाणे जाबदेणार क्र.१ अर्जदाराला घेवुन मौदा येथे राहण्यासाठी गेला. तेथे अर्जदार व जाबदेणार सहा महीने व्यवस्थित नांदले. त्यानंतर अर्जदार ही गरोदर राहिली. तेव्हा जाबदेणार क्र.१ याने तिला सासरी राहण्यास सांगितले. सासरी असतांना जाबदेणार क्र.२ ते ६ यांनी अर्जदाराला शिवीगाळ तसेच त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच त्यांना मुल नको आहे असे सांगीतले. त्यांनी अर्जदाराला कधीही खान्यापिण्यास दिलेले नाही व तिला उपाशी ठेवले. तिला तीच्या आई-वडीलांशी बोलु देत नव्हते. तसेच तिला दवाखान्यात देखिल उपचाराकामी नेत नव्हते. सदरची बाब अर्जदाराने जाबदेणार क्र.१ याला सांगीतली असता त्यानेसुद्धा त्याकडे दुर्लक्ष केले. दिनांक २/११/२०१४ रोजी जाबदेणार यांनी अर्जदाराला घरातुन हाकलुन दिले. त्यादिवशी ती दिवसभर घराबाहेर थांबली. रात्र झाल्यानंतर ती तिच्या माहेरी गेली व बेशुद्ध पडली. तिच्या आई-वडीलांनी तिला दवाखान्यात नेले असता तिने बरेच दिवस अन्न पोटात घेतले नसल्याचे समजले. अर्जदाराच्या वडीलांनी जाबदेणार क्र.१ याला फोन केला परंतु तो भेटण्यास आला नाही.

४. अर्जदारास उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वत:चा सांभाळ करु शकत नाही. उलटपक्षी जाबदेणार हा स्वत:चा ट्रक चालवितो. त्याचे बोसुरपुर, उत्तरप्रदेश येथे १०० एकर जमिन आहे. तो महीन्याला एक लाख रुपये कमवितो. त्यामुळे तो अर्जदाराला दरमहा रू. ५०,०००/- देउ शकतो. जाबदेणार क्र.२ व ४ हे खाजगी नोकरी करतात. जाबदेणार याने अर्जदाराचा त्याग केल्यापासुन अर्जदाराचे पालनपोषणाची जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने सदरचा अंतरिम पोटगीचा अर्ज केला आहे.

५. जाबदेणार याने हजर होउन त्याचे म्हणणे दिले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला आहे.

६. अर्जदारातर्फे वकील श्री. एस.एम.कुशवाह यांनी युक्तीवाद केला.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही जाबदेणारांनी तिच्या विरूध्द घरगुती हिंसाचार केला काय ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | होय. |
| २. | अर्जदार मागणीप्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | होय. अर्जदार यांना दरमहा रू. १०००/- व अर्जदार हिची मुलगी नामे खुबु हिस दरमहा रू. ५००/- |
| ३. | कोणता आदेश ? | अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |

**७.** अर्जदाराने अर्जाचे पृष्टयर्थ स्वत:चा पुरावा शपथपत्रादवारे नि.क्र.७ वर सादर केला आहे. अर्जदाराने नि.क्र.३ मधील यादी प्रमाणे लग्न पत्रिका, व मुलीचा जन्म दाखला दाखल केले आहे.

**८.** अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह दि.२८/०६/२०१२ रोजी कामठी येथे संपन्न झाला याबाबत अर्जदार हीने लग्नपत्रिका दाखल केलेली आहे. तसेच मुलीचा जन्मदाखला दाखल केलेला आहे. तसेच तीने नि.क.७ द्वारे तीचे शपथपत्र दाखल केल्यामुळे जाबदेणार क्र.१ व अर्जदार यांचे लग्न झालेले आहे व त्यांना एक मुलगी आहे असे प्रथम दर्शनी दिसुन येते.

**<u>मुद्दा क्र. १ व २ साठी</u>**

**९.** अर्जदाराच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला यातील जाबदेणार क्र.१ ते ६ यांनी अर्जदारां विरूध्द घरगुती हिंसाचार केलेला आहे. त्यामुळे अर्जदारास पोटगी मिळण्याचा अधिकार आहे ही बाब सिध्द करण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे.

DISTRICT COURT NAGPUR

१०. घरगुती हिंसाचार कायदयाप्रमाणे कलम २३ च्या अर्जाचा विचार करता अर्जदाराने प्रथमदर्शनी तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब दाखविणे महत्वाचे आहे. ही बाब दाखविण्यासाठी अर्जदाराने तिचे शपथपत्र दाखल केलेले आहे. शपथपत्रामध्ये अर्जदाराने जाबदाराने तिच्या विरूध्द केलेल्या घरगुती हिंसाचाराचे कथन केलेले आहे. यामध्ये महत्वाची गोष्ट म्हणुन जाबदेणार याने अर्जदारास जबरदस्तीने हाकलुन दिलेले आहे असे कथन केलेले आहे. जाबदेणाराने अर्जदारास हाकलुन दिल्यापासून आजतागायत जाबदार यांनी अर्जदाराची पालनपोषनाची व्यवस्था केलेली नाही असेही कथन केलेले आहे.

११. अर्जदाराची अर्जामधील वरील कथने पाहता व अर्जदाराने जाबदेणाराविरूध्द दाखल केलेली केस पाहता जाबदेणाराने अर्जदाराविरूध्द प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार केला ही बाब स्पष्ट होते. याठिकाणी हे नमुद करणे योग्य होईल की, अर्जदार व जाबदेणार यांचा विवाह सन २०१२ साली झाला. सदर विवाहातुन मुलगी खुबु जन्मास आली. अर्जदाराची कथने पाहता व जाबदेणाराने दिलेले म्हणणे पाहता, जाबदार यांनी अर्जदाराची पालनपोषण करण्याची जबाबदारी पार पाडली नसल्याचे स्पष्ट दिसुन येते. तसेच कोणतीही स्त्री दोन वर्षे संसार करून कोणत्याही कारणाशिवाय जाबदेणाराचा त्याग करेल असे प्रथमदर्शनी वाटत नाही.

१२. घरगुती हिंसाचार कायदयामध्ये घरगुती हिंसाचार या शब्दाची व्याख्या दिलेली आहे व सदर व्याख्यानुसार स्त्रीचे पालनपोषण न करणे हे सुध्दा हिंसाचार या व्याख्येत बसते. सदर केस पाहता जाबदेणाराने अर्जदारास पालनपोषणासाठी काही रक्कम दिली असे कुठेही रेकॉर्डवरून दिसुन येत नाही. तसेच जाबदेणाराची अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी असताना जाबदेणाराने ती जबाबदारी पार पडलेली नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रथमदर्शनी घरगुती हिंसाचार झाला ही बाब सिध्द केलेली आहे.

DISTRICT COURT, NAGPUR

**१३.** जाबदेणार हे स्वत:चा ट्रक चालवितात. तसेच त्यांची शंभर एकर शेती आहे. त्यापासुन त्यांना दरमहा १,००,०००/- उत्पन्न मिळते. अर्जदाराने जाबदेणा-याचा उत्पन्नाचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही.

**१४.** परंतु अर्जदार व मुलगी खुबु यांना सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी जाबदेणार नं. १ याची आहे. सदरची जबाबदारी तो नाकारु शकत नाही. तसेच जाबदेणार क्र. १ हा काहीना काही उत्पन्न मिळवित असेल असे वाटते.
त्यामुळे जाबदेणार नं. १ याने अर्जदारास दरमहा रक्कम रूपये १,०००/- व मुलगी खुबु हिस रू. ५००/- इतकी पोटगी या अर्जदाखल तारखेपासुन देणे योग्य राहील. म्हणुन मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे. मुद्दा क्र. ३ साठी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. जाबदार क्र. १ याने अर्जदार नं. १ यांना रू.१०००/-(रूपये एक हजार फक्त) व मुलगी नामे खुबु हिस रू. ५००/- (रूपये पाचसे फक्त) इतकी पोटगी या आदेशापासुन दयावी.

२. या अर्जाचा खर्च वादाच्या अनुषंगाने आकारण्यात येईल.

दिनांक : ५/०८/२०१९

(एस.एस.गाडवे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कामठी

DISTRICT COURT NAGPUR

DISTRICT COURT
NAGPUR